**राज्य शासनाच्या "महात्मा गांधी तंटामुक्त गांव मोहिम"**
**निवडणुकीच्या आचारसंहितेमध्ये राबविण्यासंबंधी--**
**ग्रामपंचायत निवडणुका तंटा नाही**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
**क्रमांक-रानिआ/ग्रापनि/२००७/प्र.क्र.८/का-८,**
**नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,**
**मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.**
**दिनांक- १२ नोव्हेंबर, २००७.**

## आ दे श

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-एमआयएस-१००७/सीआर-२३८/पोल-८, दिनांक- १९ जुलै, २००७ अनुसार **"महात्मा गांधी तंटामुक्त गांव मोहिम"** महाराष्ट्रामध्ये राबविण्यासाठी शासन निर्णय जारी केला आहे. ही योजना मुख्यत्वे करुन गांव पातळीवर छोटया कारणावरुन निर्माण होणाऱ्या तंटयाचे पर्यावसन मोठया तंटयामध्ये होऊ नये, त्यातून आर्थिक नुकसान होऊ नये व कुटुंबाची, समाजाची व गांवाची शांतता धोक्यात येऊ नये यासाठी ही योजना सुरु करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक- ७.१(७) यामध्ये ग्रामपंचायतींच्या निवडणुका बिनविरोध करण्यासाठी प्रयत्न करणे ही एक प्रतिबंधात्मक उपाययोजना नमूद करण्यात आली आहे;

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाकडे अशा स्वरुपाच्या माहिती/ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत की, **"महात्मा गांधी तंटामुक्त गांव मोहिमे"**चा वापर विशिष्ट व्यक्तींची ग्रामपंचायतीवर निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी प्रयत्न करण्यात येतो;

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या उद्देशिकेमध्ये भारत हे सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य असे नमूद करण्यात आले आहे. कुठल्याही लोकशाही गणराज्याची निवडणूक हे अविभाज्य अंग असते. त्यामुळे कुठल्याही लोकशाही संस्थेच्या निवडणुकीला तंटा म्हणणे योग्य होणार नाही. खऱ्या अर्थाने भारतीय लोकशाहीचा ग्रामपंचायत हा पाया आहे;

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ ट (२४३ के) राज्यातील सर्व प्रकारच्या पंचायतींच्या त्यामध्ये जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांचा समावेश आहे, त्यांचे अधिक्षण, संचालन, नियंत्रण व अशा निवडणुकांचे आयोजन या बाबी राज्य निवडणूक आयोगाकडे देण्यात आलेल्या आहेत आणि कुठलीही निवडणूक भयमुक्त, मोकळया व योग्य वातावरणत पार पडेल हे राज्य निवडणूक आयोग चे कर्तव्य आहे;

त्याअर्थी, राज्य निवडणूक आयोग असे आदेश देत आहे की, **"महात्मा गांधी तंटामुक्त गांव मोहिम"** महाराष्ट्रामध्ये राबविण्यासंबंधी काढलेल्या शासन निर्णयामध्ये जरी परिच्छेद क्रमांक- ७.१(७) यामध्ये ग्रामपंचायतींच्या निवडणुका बिनविरोध करण्यासाठी प्रयत्न करणे या उपाययोजनेचा समावेश असला तरी ग्रामपंचायत निवडणुका या तंटा नाही म्हणून त्यावेळी कुठल्याही ग्रामपंचायत क्षेत्रात निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यापासून त्या ग्रामपंचायतीची निवडणूक बिनविरोध व्हावी, त्यासाठी जर दबाव तंत्राचा वापर होण्याची शक्यता आहे आणि गरीब, दलित आणि दुर्बल घटकांवर बलशक्ती किंवा धनशक्ती यांचा वापर करुन निवडणुका बिनविरोध होण्यासाठी प्रयत्न होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून ग्रामपंचायत निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यापासून बिनविरोध निवडणुकांसंबंधी महात्मा गांधी तंटामुक्त गांव मोहिम योजनेत होणाऱ्या बैठकीमध्ये जिल्हाधिकारी, पोलिस अधिक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अपर जिल्हाधिकारी, उप विभागीय अधिकारी, उप विभागीय पोलिस अधिकारी, तहसिलदार, गट विकास अधिकारी, तालुक्यातील पोलिस ठाण्यांचे प्रमुख, महसूल मंडळ अधिकारी, पोलिस पाटील, तलाठी, ग्रामसेवक तसेच असे अन्य अधिकारी की, ज्यांचे वेतन राज्य शासन यांच्याकडून थेट किंवा राज्य शासनामार्फत दिल्या जाणाऱ्या अनुदानातून दिले जाते अशा अधिकाऱ्यांनी ग्रामपंचात निवडणुकांसंबंधी बैठकामध्ये आचारसंहितेच्या कालावधीत भाग घेतल्यास तो निवडणूक आचारसंहितेचा भंग मानण्यात येईल व त्याच्याविरुध्द उचित कार्यवाही करण्यात येईल.

( नन्द लाल )
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
३) प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
४) प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
५) सर्व विभागीय आयुक्त
६) सर्व जिल्हाधिकारी
७) सर्व पोलिस अधिक्षक
८) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
९) उप विभागीय अधिकारी
१०) सर्व गट विकास अधिकारी/ सर्व तहसिलदार
११) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

D:\GRAM PANCHAYATS\aab-grampanchayat.doc